MHNG100022042022

## निशानी क्र.५ वर आदेश

वादीने सदरचा दावा हा घोषनेबाबत व आदेशात्मक मनाई हुकूम मिळणेकामी प्रतिवादीविरूध्द दाखल केलेला आहे. त्यामध्ये वादीने सदरचा दावा हा दाव्याचा निकाल लागेपावेतो तात्पुरता मनाई हुकम मिळण्याकरिता ऑर्डर ३९ कलम १ व २ प्रमाणे सहकलम १५१ अन्वये दाखल केला आहे.

**वादीची थोडक्यात हकिकत:–**

२) वादीने त्यांच्या दाव्यामध्ये असे सांगितले आहे की, वादी हे शेतकरी आहे व वादीच्या नावाने व कब्जे वहीवाटीत मौजा आंबोली येथे प.ह.न.४८, ता. उमरेड, जि.नागपुर येथे गट न.६० व गट न.५९/३ येथे त्यांची शेती स्थित आहे. सदर दाव्याचे वर्णण सदर अर्जातील परिच्छेद क्र.२ व दाव्यामध्ये परिच्छेद क्र.१ यामध्ये नमुद केलेले आहे. (यापुढे सदर शेतीचा उल्लेख हा दावामिळकत असे संबोधण्यात येईल.)

३) वादीने पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ५ हे सख्खे बहीणभाऊ असुन प्रतिवादी क्र.४अ ते ४क हे प्रतिवादी क्र.४ यांचे वारस आहेत. प्रतिवादींची जमीन मौजा आंबोली येथे प.ह.न.४८, ता. उमरेड, जि.नागपुर येथे गट न.६३ मध्ये स्थित आहे व ती जमीन प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना शासनामार्फत भूदानामध्ये प्राप्त झालेली आहे. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना सदर शेतीमध्ये वहीवाट करण्यासाठी मुख्य आंबोली पिराया रस्त्याने येउन नाल्यात

उतरून व नाला पार करून प्रतिवादी सदर शेतजमीनीची वहीवाट फार सुरूवातीपासुन करित आलेले आहे. असे असतांना प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या सांगण्यावरून दावा शेतीच्या पश्चिम व उत्तर भागाला लागुन असलेला नाला तेथील गाळ उपसुन दावा शेतीच्या उत्तरेकडील पुर्व–पश्चीम व पश्चीमेकडील उत्तर–दक्षिण धु–यावर बदनियतीने टाकुन त्या धु–यावरिल माती प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.६ यांच्या मदतीने सपाट करून प्रतिवादी क्र.१ ते ५ च्या शेतजमीनी करिता त्यावर रस्ता तयार केला व त्यांनी जुना रस्ता सोडुन नविनच रस्त्याने वहीवाट करायला सुरूवात केली व ते बेकायदेशीर घुसखोरी करित आहेत. प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ ला मदत करून त्यांच्या पदाचा दुरूपयोग केला.

४) त्यांनी सदर नाला उपसल्यामुळे पावसाळ्यात वादीच्या शेतात पाणी साचुन सोयाबीणीचे पिक खराब झाले. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी शेतीच्या उत्तर–पश्चिम भागावर जाणे–येणे सुरू केले. त्यामुळे वादीच्या पिकाचे नुकसान केले. प्रतिवादी क्र.१ ते ५ त्यांच्या शेताच्या मधोमध पुर्व–पश्चिम सामायिक धुरा आहे व त्या धु–याने वादी व प्रतिवादी अनेक वर्षापासुन सामायिकपणे ये–जा करित होते. परंतु, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रतिवादी क्र.६ ला हाताशी धरून धु–याचा अर्धा भाग जे.सी.बी.ने भुईसपाट करून त्यावर नांगरणी करून शेतीसाठी उपयोग करित आहे. त्याबाबत वादीने दि.०९.०५.२०२२ रोजी उमरेड पो.स्टे.ला व दि.१०.०५.२०२२ रोजी तहसिलदार, उमरेड यांच्याकडे तक्रार केली होती. तहसिलदार यांनी दि.०२.०६.२०२२ रोजी प्रत्यक्ष मोका चौकशी करून पंचनामा केला परंतु, प्रतिवादी क्र.१ व २ च्या गैरकृत्यामध्ये काहीही फरक पडला नाही.

५) प्रतिवादी क्र.१ ते २ भविष्य काळात सदर उर्वरित पुर्व–पश्चिम धुरा तोडुन वाद शेतावर अतिक्रमण करण्याच्या प्रयत्नात आहे. प्रतिवादींना वादीने उभ्या पिकातुन ये–जा करू नका असे हटकले असता, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी

काय करायचे ते कर तुझ्या शेतातुन आम्ही जाणार, तुझ्या शेतावर ताबा करणार, तुझ्याशी पाट लाउ, तु आमचे काही बिघडवु शकत नाही असे अश्लील व धमकीवजा बोलु लागले. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र.१ त ८ यांनी दावा शेतजमीनीच्या पश्चिमेकडील उत्तर–दक्षिण व उत्तरेकडील पुर्व–पश्चिम धु–यावर वहीवाट त्वरित थांबविण्यासाठी व वादीच्या कब्जेवहीवाटीस अडथडा करू नये, असा आदेश पारित करण्याकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

**<u>प्रतिवादी क्र.१ व २ यांचे कथन थोडक्यात:–</u>**

६) प्रतिवादी क्र.१ व २ यांनी संयुक्त लेखी बयाण नि.क्र.३९ वर दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या लेखी बयाणामध्ये सांगितले आहे की, वास्तविक दाव्यातील नाला हा सार्वजनिक आहे. सदर नाल्यावर वादीच्या शेताजवळ उत्तर भागात सिमेंट कॉन्क्रीटचा पक्का पुल आहे व सदर पुलापासुन १०० ते २०० मीटर उत्तरेकडील भागात सदर नाल्यावर बंधारा आहे. सदर पुल व बंधारा ब–याच वर्षांपासुन सदर नाल्यावर अस्तित्वात आहे. सदर नाला, पुल, बंधा–याची देखदेख, खोलीकरण, पाणी साठवणुक, अडवणुक, पाणी अडवणे व जिरवणे व ग्राउंड लेव्हल वॉटर वाढविणे इ. कार्यक्रम व काम सदर नाल्याबाबत उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृदा व जलसंधारण उपविभाग कुही, वडोदा, पेंच वसाहत भंडारा रोड, वडोदा ता. कामठी, जि. नागपुर या विभागाकडे आहे. सदर विभागाने सन २०२२ च्या पावसाळ्यापुर्वी साठवण बंधा–याची पाणी साठवणूक वाढविण्यासाठी सदर नाल्याचे खोलिकरण केले व बंधा–याची पाणी साठवणूक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने परिपत्रका नुसार कार्यवाही केली.

७) वास्तविक दावा शेतातुन शेत सर्व्हे न.५९/३ वाजीदुल अर्ज नोंदीप्रमाणे स्थायी सरकारी, सार्वजनिक सडक वहीवाटीचा रस्ता आहे तशी नोंद सर्व्हे नं.५९/३ च्या ७/१२ च्या उता–यावर दर्ज आहे. सदर रस्त्यानेच पुर्वी

प्रतिवादी उपरोक्त शेतात जाण्या–येण्यासाठी वहीवाट बैलबंडी व ट्रॅक्टरने करित होता. परंतु,सदर शासकीय सार्वजणिक रस्ता त्यांनी अतिक्रमण करून वाहतीत घेतला व सदर जुन्या रस्त्याने जाणे येणे करण्यास अडथळा व मज्ञाव करित आहे. प्रतिवादी व त्यांची पत्नी सदर जुन्या शासकीय रत्याने वहीवाट केल्यास वादी भांडण करते. प्रतिवादींनी पुर्वेकडील नाल्याच्या पाळीने/थळीने त्यांच्या शेतात जाण्या–येणे करून वहीवाट करित आहे. परंतु, आता वादी व त्याची पत्नी आकसबुध्दीने सदर नाल्याच्या थळीवरील रस्ता बंद करण्याच्या इराद्यात आहे. तसेच प्रतिवादींची दावा शेत सर्व्हे न.६० व प्रतिवादीचा सर्व्हे न.६३ मध्ये पुर्व–पश्चिम धुरा आहे. सदर धु–याच्या पलिकडे वादी हे १० ते १५ फुट रूंदीची जागा बळकविण्याचा वादीचा ईरादा व प्रयत्न आहे. प्रतिवादीला नाल्याच्या थळीने जाण्याचा अधिकार आहे. वादीने सदर रस्ता बाभळीचे खोड आडवे टाकून बंद करण्याचा इरादा आहे. त्यामुळे सदरचा अर्ज हा खारिज करण्याची विनंती केली. प्रतिवादी क्र.४अ व ४क यांच्याविरूध्द दावा एकतर्फी चालविण्यात आला आहे. प्रतिवादी क्र.४ब यांच्याविरूध्द दावा हा लेखी बयाणाशिवाय चालविण्यात आलेला आहे. नि.क्र.२१ व १९ प्रमाणे प्रतिवादी क्र.३ व ५ हे न्यायालयात हजर झाले व त्यांच्यातर्फे वकील श्री. एस.एम.पिंपळकर यांनी वकीलपत्र अभिलेखावर दाखल केल्याचे दिसुन येते.

**<u>प्रतिवादी क्र.६ यांचे कथन थोडक्यात:–</u>**

८) प्रतिवादी क्र.६ यांनी नि.क्र.४० वर त्यांचे म्हणणे दाखल केले. त्यांनी त्यांच्या लेखी बयाणामध्ये सांगितले आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी त्यांना जे.सी.बी. घेउन त्यांच्या शेतातील कचरा काडी काढण्यासाठी बोलविले होते. त्यानुसार त्यांनी कचरा काडी काढली. त्यांचा वादीशी काही संबंध नसतांना त्यांना विनाकारण सदर दाव्यामध्ये पार्टी केलेले आहे.

**<u>प्रतिवादी क्र.७ व ८ यांचे कथन थोडक्यात:–</u>**

९) प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी संयुक्त लेखी बयाण दाखल केलेल आहे. त्यांनी त्यांच्या लेखी बयाणात सांगितले आहे की, वास्तविकता दाव्यातील नाला हा सार्वजनिक आहे. सदर नाल्यावर वादीचे शेताजवळ उत्तर भागावर सिमेंट कॉन्क्रीटचा पक्का पुल आहे. सदर पुलावपासुन १०० ते २०० मीटर उत्तरेकडील भागात सदर नाल्यावर बंधारा आहे. सदर पुल व बंधारा बरेच वर्षापासुन सदर नाल्यावर अस्तित्वात आहे. सदर नाला, पुल, बंधा–याची देखदेख, खोलीकरण, पाणी साठवणुक, अडवणुक, पाणी अडवणे व जिरवणे व ग्राउंड लेव्हल वॉटर वाढविणे इ. कार्यक्रम व काम सदर नाल्याबाबत उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृदा व जलसंधारण उपविभाग कुही, वडोदा, पेंच वसाहत भंडारा रोड, वडोदा ता. कामठी, जि. नागपुर या विभागाकडे आहे. सदर विभागाने सन २०२२ च्या पावसाळ्यापुर्वी साठवण बंधा–याची पाणी साठवणूक वाढविण्यासाठी सदर नाल्याचे खोलिकरण केले व बंधा–याची पाणी साठवणूक क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने परिपत्रकानुसार कार्यवाही केली व त्यासंबंधीत साठवण बंधा–याच्या पळ्या केवळ ग्रामपंचायत आंबोली यांना हस्तांतरित करण्यात आल्या व सदर विभागामार्फत ६ पळ्या ग्रामपंचायत आंबोलीला प्राप्त झाल्या असुन तसे पत्र ग्रामपंचायत आंबोलीने दि.१७.०२.२०२२ रोजी उपरोक्त विभागास दिलेले आहे. त्यामुळे सदरचा दावा खारिज करण्याची विनंती केली.

१०) वादीचा अर्ज, दावा व अभिलेखावरिल दस्तऐवजांचे अवलोकन केले असता खालील मुद्दे विचारार्थ तयार केले त्यावरिल कारणमिमांसा व निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | मुद्दे | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | वादी शाबीत करतो काय की, त्यांच्या बाजुने प्रथम दर्शनी केस आहे? | नाही |

| | | |
|---|---|---|
| २. | वादी शाबीत करतो काय की, न्यायाचा समतोल हा त्यांच्या बाजुने आहे? | नाही |
| ३. | वादी शाबीत करतो काय की, जर तात्पुरता मनाई हुकूम त्यांच्या बाजुने पारीत केला नाही तर त्यांचे पैशाच्या स्वरूपात भरून न निघणारे नुकसान होईल? | नाही |
| ४. | आदेश काय? | अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

**११)** वादीने अर्जाला पुष्टी देण्याकामी अभिलेखावर नि.क्र.४ सोबतच्या यादीसोबत खालील दस्तऐवजांच्या काही सत्यप्रती व काही छायांकित प्रति दाखल केलेल्या आहेत.

**दस्त क्र.१:–** ७/१२ चा उतारा गट न.५९/३.
**दस्त क्र.२:–** ७/१२ चा उतारा गट न.६०.
**दस्त क्र.३:–** नमुना ८ अ (जमाबंदी पत्रक)
**दस्त क्र.४:–** गट न.५९ चा नकाशा
**दस्त क्र.५:–** पटवारी नकाशा
**दस्त क्र.६:–** ७/१२ चा उतारा
**दस्त क्र.७:–** नमुना ८ अ
**दस्त क्र.८:–** पटवारी दाखला
**दस्त क्र.९:–** तहसिलदार यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीची छायांकित प्रत.
**दस्त क्र.१०:–** पो.स्टे.यांच्याकडे दाखल केलेल्या तक्रारीची छायांकित प्रत.
**दस्त क्र.११:–** घटनास्थळ पंचनामा
**दस्त क्र.१२ ते १६ :–** वादमिळकतीचे फोटे.
**दस्त क्र.१७:–** फोटोची पावती
**दस्त क्र.१८:–** नोटीस
**दस्त क्र.१९ ते २२:–** पोच पावत्या.
**दस्त क्र.२३:–** नोंदणीकृत नोटीस.
**दस्त क्र.२४:–** पोस्टाची पावती
**दस्त क्र.३५ ते २८ :–** पोच पावत्या

**दस्त क्र.२९:–** नोटीस पाठविलेला लिफाफा

त्यानंतर वादीने नि.क्र.५७ च्या यादीसोबत अभिलेखावर खालील दस्तऐवज दाखल केलेल आहेत.

**दस्त क्र.१:–** गट न.६० चे चतुर्सिमा शपथपत्र
**दस्त क्र.२:–** गट न.५९/३ चे चतुर्सिमा शपथपत्र

त्यानंतर वादीने नि.क्र.५३ च्या यादीसोबत अभिलेखावर खालील दस्तऐवज दाखल केलेल आहेत.

**दस्त क्र.१ ते ५:–** वादमिळकतीचे फोटो.

त्यानंतर वादीने नि.क्र.३७ च्या यादीसोबत अभिलेखावर खालील दस्तऐवज दाखल केलेल आहेत.

**दस्त क्र.१ ते ६:–** पोलिस तक्रारीची छायांकित प्रती.
**दस्त क्र.७:–** पोस्टाची पावती
**दस्त क्र.८ ते १३:–** वादमिळकतीचे फोटो
**दस्त क्र.१४:–** वैद्यकिय प्रमाणपत्र

**प्रतिवादींनी दस्तऐवज दाखल केल्याचे दिसुन येत नाही.**

**मुद्दा क्र. ०१ व ३ करिता:–**

१२) वादीच्या वकीलाचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे सांगितले आहे की, वाद शेत मिळकतीवर प्रतिवादीने ये–जा करून वादीच्या शेताचे नुकसान करित आहे. तसेच प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी प्रतिवादी क्र.१ व २ यांना मदत करून वादीच्या शेतालगत असलेल्या नाल्यातील गाळ उपसला, त्यामुळे वादीच्या शेतामध्ये पावसाचे पाणी साचुन वादीच्या शेतमालाचे नुकसान होत आहे. तसेच प्रतिवादी हे वादीच्या शेताचा धुरा फोडुन वादीच्या शेतामध्ये अतिक्रमण करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो सदर अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली. याउलट सर्व प्रतिवादी तर्फे वकील श्री. एस. एम. पिंपळकर यांनी युक्तीवाद करून

सांगितले की, वादीच्या शेतीतुन पुर्वी प्रतिवादींना रस्ता होता याबाबत वादीच्या शेतीच्या ७/१२ मध्ये ही बाब नमुद आहे. तसेच सदरचा रस्ता वादीने बंद केल्यामुळे प्रतिवादी हे दाव्यात उल्लेख केलेल्या नाल्याच्या काठाने त्यांच्या शेतामध्ये वहीवाट करित होते. त्यानंतर प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी सदर नाल्याचे शासनाच्या आदेशाप्रमाणे खोलीकरण केले. वादीने दाव्यामध्ये परिच्छेद क्र.८ मध्ये मान्य केले आहे की, प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी नविन बेकायदेशीर रस्ता तयार करून दिला आहे. परंतु, सदरच्या नाल्याचे काम हे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी केलेले नाही. प्रतिवादी क्र.१ व २ यांना सदर नाल्याच्या पाळीने जाणा–या रस्त्याशिवाय दुसरा रस्ता उपलब्ध नाही. जर सदरचा रस्ता बंद झाला, तर प्रतिवादीला त्यांच्या शेतीची मशागत करता येणार नाही व त्यामुळे प्रतिवादीचे अतोनात नुकसान होईल. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली.

१३) संपुर्ण अर्जाचे व त्यावरिल म्हणणे तसेच दस्तऐवज यांचे अवलोकन केले. वादीने त्यांच्या अर्जामध्ये सांगितले आहे की, प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी प्रतिवादी क्र.१ व २ च्या सांगण्यावरून व बहकाव्यावरून प्रतिवादी क्र.१ व २ चे ट्रॅक्टर व बैलगाडी जाण्यासाठी नाल्याची उपसलेली माती वादीच्या शेताच्या पुर्वेकडील धु–यावर टाकली व उत्तरेकडील पुर्व–पश्चिम नाल्याच्या काठाणे टाकली. त्यामुळे पावसाळ्याचे पाणी साचुन त्यांचे पिक खराब झाले. तसेच प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दावा शेतीच्या उत्तर–पश्चिम भागावर जाणे–येणे सुरू केले व पेरलेले पिक तुडवित पिकाचे नुकसान करतात. याउलट प्रतिवादीने त्यांच्या बयाणामध्ये सांगितले आहे की, वादीच्या शेतातुन त्यांना त्यांच्या शेतामध्ये जाण्यासाठी जुना रस्ता होता परंतु, सदरचा रस्ता हा वादीने बंद केल्यामुळे प्रतिवादी हे सदर नाल्याच्या काठाने त्यांच्या शेतामध्ये मशागत करण्यासाठी जातात. वादीने दाखल केलेल्या दस्तऐवजांपैकी भुमापन क्र.५९/३

या वादमिळकतीच्या ७/१२ च्या उता–याचे अवलोकन केले असता, त्यामध्ये स.न.तुन.वा.अ.नो.प्रमाणे पिरायाकडे जाणारी स्थायी पायवाट आहे अशी नोंद आहे. त्यामुळे पुर्वीपासुन वादीच्या शेतातुन वाट होती हे सदर उता–यातील मजकुरावरून प्रथमदर्शनी दिसुन येते. प्रतिवादींना वादीच्या शेतातील रस्त्याव्यतिरिक्त दुसरा रस्ता नाही असे प्रतिवादीचे कथन आहे. सदर जुना रस्ता होता किंवा कसे ही बाब दोन्ही पक्षांनी पुरावा दिल्याशिवाय ठरविता येणे अशक्य आहे.

१४) वादीच्या सांगण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ५ हे वादीच्या शेतातुन ये–जा करतात. त्यामुळे वादीच्या शेताचे नुकसान होते. त्यासंदर्भात वादीने अभिलेखावर फोटो दाखल केलेले आहेत. त्यापुढे वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी प्रतिवादी क्र.१ व २ च्या सांगण्यावरून सदर नाल्यातील माती उपसुन वादीच्या शेताच्या धु–यावर टाकल्याने व सदर धुरा हा प्रतिवादीचे ट्रॅक्टर, बैलगाडी ने–आण करण्यासाठी सवान केल्याचे सांगतात. परंतु, वादीने त्यांच्या दाव्यामध्ये परिच्छेद क्र.८ मध्ये मान्य केले आहे की. प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी सरकारी खर्चाने नविन बेकायदेशीर रस्ता तयार करून दिला. त्यामुळे वादीच्या शेताचे अतोनात नुकसान झाले. परंतु, प्रतिवादी क्र.७ व ८ हे ग्रामपंचायत सचिव व सरपंच आहे. त्यांनी त्यांच्या लेखी बयाणामध्ये सांगितले आहे की, सदर नाल्याचे खोलीकरण हे शासकिय नियमाप्रमाणे व आदेशानुसार केलेले असल्याचे सांगतात. त्यामुळे वादी सांगतात त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ व २ यांनी सदरचे नाल्याचे खोलीकरण करून त्यामधील गाळ उपसुन वादीच्या शेतावरील धु–यावर टाकला व त्यावरून रस्ता केल्यामुळे प्रतिवादी क्र.१ व २ हे त्यांच्या शेतातुन ये–जा करतात. परंतु, प्रतिवादी क्र.७ व ८ यांनी सदर नाल्याचे खोलीकरण बेकायदेशीररित्या केले किंवा कसे ही बाब सद्यपरिस्थितीत ठरवता येत नाही. सदर बाब ही दोन्ही पक्षाचा पुरावा आल्यानंतर

ठरवता येईल.

१५) वादीने पुढे असे कथन केले आहे की, त्यांनी प्रतिवादी विरूध्द तहसिलदार यांच्याकडे अर्ज दाखल केला होता व त्या ठिकाणी तहसिलदार यांनी प्रत्यक्ष घटनास्थळावर येउन पंचनामा तयार केला असे सांगतात. सदर पंचनाम्याची प्रत त्यांनी अभिलेखावर दाखल केलेली आहे. त्याप्रमाणे पंचनामा हा प्रत्यक्ष मोक्यावर केल्याचे दिसुन येते. परंतु, त्यापुढे सदर प्रकरणामध्ये मा. तहसिलदार यांनी काय आदेश पारित केला? अथवा सदर प्रकरणाबाबत काय निर्णय झाला? याबाबत कोणतेही दस्त वादीने सदर प्रकरणात दाखल केल्याचे दिसुन येत नाही. तसेच वादीने पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी हे त्यांचा धुरा फोडुन अतिक्रमण करण्याच्या तयारीत आहे. परंतु,त्याबाबत कोणत्याही लगतधारकाचे शपथपत्र अथवा तसा पुरावा वादीने पथमदर्शनी अभिलेखावर दाखल केल्याचे दिसुन येत नाही. प्रतिवादी क्र.७ व ८ यांच्या बयाणाप्रमाणे नाल्याच्या काठावर जो नाल्यामधील गाळ टाकलेला आहे तो शासकीय योजनेप्रमाणे टाकलेला आहे. प्रतिवादी क्र.१ व २ च्या कथनाप्रमाणे त्यांना त्यांच्या शेतामध्ये मशागत करण्याकरिता जाण्यासाठी जुना रस्ता वादीने बंद केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी हे सदर नाल्याच्या कडेने असलेल्या पाळीवरून त्यांच्या शेतामध्ये जाणे–येणे करतात. त्यामुळे जर प्रतिवादीचा जाण्या येण्याचा रस्ता बंद केला तर प्रतिवादीला त्यांच्या शेतामध्ये मशागत करण्यासाठी जाता येणार नाही. त्यामुळे या क्षणी असे दिसुन येते की, जर प्रतिवादीचा रस्ता बंद केल्यास वादीच्या तुलनेत प्रतिवादीचे अतोनात नुकसान होईल व प्रतिवादीला त्यांच्या शेतीची मशागत करता येणार नाही.

१६) एकंदरित वरिल संपुर्ण चर्चेचे अवलोकन केले असता, वादीला प्रथमदर्शनी केस त्यांच्या बाजुने असल्याचे तसेच दाव्याचा अधिभार त्यांच्या बाजुने

आहे ह्या बाबी सिध्द करता आलेल्या नाही. तसेच प्रतिवादीचा रस्ता बंद केल्यास प्रतिवादीचे वादीच्या तुलनेत अतोनात नुकसान होईल व त्यांना शेताची मशागत करता येणार नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.४ साठी खालील आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. वादीचा नि.क्र.५ वरिल अर्ज नामंजुर करण्यात आला.

(आदेश न्यायालयीन वेळेत व खुल्या कक्षात अग्रघोषित करण्यात आला.)

RAVI SATYABHAN MANKAR

order
Digitally signed by RAVI SATYABHAN MANKAR
Date: 2026.03.27 18:03:57 +0530

उमरेड (आर.एस.मानकर)

दि.२५–०३–२०२६ २रे सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उमरेड

MHNG100022042022

आर.सी.एस.नं.११७/२०२२
अरूण वि.. जालम व इतर
नि.५ खाली

| | | |
|---|---|---|
| **CERTIFICATE** | | |
| I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order. | | |
| Name of Court | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Umred, Dist.Nagpur |
| Presiding Officer | :- | R. S. Mankar |
| Judgment uploaded by | :- | S.B.Ghardinkar(StenographerL.G) |
| Date of Judgment | :- | 25.03.2026 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 25.03.2026 |
| Uploaded on dated | :- | 27.03.2026 |